**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये देणगी शुल्क घेण्यास प्रतिबंध.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**परिपत्रक क्रमांक:- माशाफी १११०/(३४४/२०१०)/माशि-३**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- २१ एप्रिल, २०१२.**

## <u>परिपत्रक</u>

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, देशात १ एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियमावली २०११ दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ पासन राज्यात लागू करण्यात आली आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ चे कलम १३(१) अन्वये बालकांना शाळा प्रवेश देतांना देणगी शुल्क आकारण्यास प्रतिबंध करण्यांत आला आहे. देणगी शुल्क आकारणा-या शाळांवर उक्त अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये आकारलेल्या देणगी शुल्काच्या १० पट दंडाची तरतूद आहे.

२. जिल्हा शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक यांनी शाळेने देणगी शुल्क आकारल्याबाबत प्राप्त तक्रारीवर प्रकरणपरत्वे चौकशी करुन उक्त शाळांवर बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ चे कलम १३(२) अन्वये दंडात्मक कारवाई करावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

३. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०४२१११४३५३४५३००१ असा आहे.

४. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( र. प्र. आटे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. अ.मु. सचिव, (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक शिक्षण
शिक्षण संचालक ( प्राथ.) / (माध्य./उच्च माध्य.).महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथ.) / (माध्य.), जिल्हा परिषद,
सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
माशि-३ कार्यासन / संग्रहार्थ / निवडनस्ती